जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात साहित्यिक वि. स. खांडेकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे आदी.

# साहित्यिक वि. स. खांडेकर यांना विद्यापीठात जयंतीनिमित्त अभिवादन

कोल्हापूर : मराठी साहित्यास भारतीय ज्ञानपीठाचे पहिले पारितोषिक मिळवून देणारे साहित्यिक वि. स. खांडेकर यांची १२६ वी जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. जयंतीचे औचित्य साधून वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते वि. स. खांडेकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, संचालक आजीवन अध्ययन व विस्तार विभाग डॉ. रामचंद्र पवार, इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, संचालक तंत्रज्ञान अधिविभाग डॉ. एस. एन. सापले, इतिहास अधिविभाग सहा. प्राध्यापक दत्तात्रय मचाले, उदयसिंह राजेयादव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात वि. स. खांडेकर यांना अभिवादन

कोल्हापूर : मराठी साहित्यास पहिले ज्ञानपीठ पारितोषिक मिळवून देणारे साहित्यिक वि. स. खांडेकर तथा भाऊ यांची १२६ वी जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात झाली. येथील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयात कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते खांडेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी स्मृती संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, संचालक आजीवन अध्ययन व विस्तार विभाग डॉ. रामचंद्र पवार, इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, संचालक तंत्रज्ञान अधिविभाग डॉ. एस. एन. सापले, सहायक प्राध्यापक दत्तात्रय मचाले, उदयसिंह राजेयादव उपस्थित होते.

12 JAN 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात परदेशी गीतांचे सूर

## विदेशी भाषा विभागात नववर्ष स्वागत समारंभ उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

रशियन, जर्मन, जपानी व फ्रेंच अशा जगभरातील भाषांतील गीतांच्या सुरांनी शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले. शिवाजी विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या-त्या देशांत नववर्ष स्वागताच्या परंपरांचा परिचय व्हावा, या उद्देषाने विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातर्फे दि. १० जानेवारी रोजी नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी या कार्यक्रमाचे अयोजन केले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी आपआपल्या भाषांतील गीतांचे सादरीकरण करून आपल्या देशाच्या संस्कृतीचे दर्शन घडविले.

कोल्हापूर : विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित नववर्ष स्वागत कार्यक्रमात गीत सादर करताना विद्यार्थिनी.

विविध देशांत नवीन वर्ष कशाप्रकारे साजरे केले जाते याविषयी माहितीपट दाखविले गेले. यातून विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या देशातील संस्कृतीचा परिचय झाला. प्रत्येक देशात अत्यंत उत्साहाने कुटुंब व मित्र परिवाराच्या सहवासात नववर्षाचे स्वागत केले जाते. त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे खाद्यपदार्थ बनवले जातात. पारंपरिक पेहेराव, संगीत-नृत्ये, भेटवस्तू वाटप असे कार्यक्रम होतात.

विद्यार्थ्यांनी विविध भाषांत नववर्षाचे सदिच्छा संदेश, तसेच भाषेवर आधारित मनोरंजक खेळ खेळण्याची मौजही लुटली. 'बेला चाव' हे सुप्रसिद्ध इटालियन लोकगीत गाऊन कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमात शंभर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विदेशी भाषा विभागातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी नववर्ष केक, विविध युरोपियन देशांत बनवला जाणारा 'प्रेत्झेल' ब्रेड व चहापानाने कार्यक्रमाची सांगता झाली. विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे, प्रियांका माळकर, स्नेहल शेट्ये, ज्योती पाटील, श्रद्धा खवरे, श्रावणी कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

रशियात मध्यरात्री राष्ट्राध्यक्ष राष्ट्राला संबोधित करतात आणि त्यांच्या संदेशानंतर नागरिकांकडून मेजवानीचे आयोजन केले जाते. तर जपानमध्ये 'रेड-व्हाईट' संगीत जुगलबंदी कार्यक्रम पाहतात, लांबलचक नूडल्स खातात आणि जुन्या वर्षाची सांगता करतात. जर्मनी, फ्रान्समध्ये आतिषबाजीने नववर्ष साजरे करतात.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2024
लोकमत

# ‘पीएच.डी. प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी अभ्यासात सातत्य हवे’

प्रकाश पवार

कोल्हापूर : पीएच.डी. प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी अभ्यासाचे सातत्य महत्त्वाचे असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्यावतीने पीएच.डी. प्रवेश परीक्षेसाठी ‘पीएच.डी. प्रवेश परीक्षा तयारी’ या विषयावर ऑनलाइन कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते. यावेळी उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, सी. एस. कोतमिरे उपस्थित होते.

प्रा. डॉ. पवार म्हणाले की, पीएच.डी प्रवेश परीक्षेची तयारी करताना आवश्यक विषय व संशोधन पद्धती यांचा अभ्यास करण्यासाठी सातत्य ठेवले पाहिजे. प्रथम व द्वितीय वर्षाचा आवश्यक विषयाचा अभ्यास करताना त्याच्यासाठी कोणती संशोधन पद्धती वापरलेली आहे. त्यासाठी क्रमिक पुस्तकांचा अभ्यास केला पाहिजे. विषयनिहाय कोश अभ्यासून संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. डॉ. कृष्णा पाटील यांनी स्वागत केले. डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. प्रवीण लोंढे यांनी सूत्रसंचालन केले. सचिन भोसले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात १६ रोजी पत्रकारितेवर वक्तृत्व स्पर्धा

## पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचा उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने मराठी पत्रकार दिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी दि. १६ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे.

अध्यासनाच्या इमारतीत स्पर्धेला सुरुवात होईल. स्पर्धेसाठी लोकशाही मूल्ये आणि पत्रकारिता, अर्थकारणाचा पत्रकारितेवरील प्रभाव आणि पत्रकारितेची सद्यस्थिती आणि भवितव्य हे तीन विषय निश्चित केले आहेत. स्पर्धक विद्यार्थ्यांनी यापैकी एका विषयावर आपली मते नोंदवायची आहेत. स्पर्धेसाठी पाच मिनिटे वेळ दिला जाईल. याशिवाय दोन मिनिटांचा आणखी असे सात मिनिटांचा वेळ असेल. स्पर्धेत केवळ पत्रकारितेचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.

स्पर्धेत सहभागी होण्यास ओळखपत्र बंधनकारक आहे. स्पर्धेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला तीन हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी दोन हजार रुपये तर तृतीय क्रमांकासाठी एक हजार रुपये व प्रमाणपत्र असे बक्षिसाचे स्वरूप आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्वांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेत विद्यापीठ, विविध महाविद्यालयात सुरू असलेल्या पत्रकारिता विभागातील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष

12 JAN 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सावित्रीबाईंचा वारसा कृतीतून जपावा

प्रतिनिधी
कोल्हापूर

'एकीकडे सावित्रीबाई फुलेंच्या कार्याचा वसा चालविण्याची भाषा बोलायची आणि त्याच वेळी कमी पटसंख्या म्हणून शाळा बंद करण्याची भूमिका घ्यायची, अनाथ मुलामुलींसाठीची शिक्षणासह सर्व बाबींची मदत केवळ त्यांचे वय १८ वर्षांचे झाले म्हणून बंद करायचे असे घडता कामा नये!' असे मत शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनी व्यक्त केले.

'दिलासा सामाजिक विश्वस्त संस्था' व शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. उद्यानविद्या प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे प्रमुख डॉ. अभिजीत जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्यानविद्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी 'दिलासा'च्या संस्थेलाही अभ्यासभेट दिली. सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजन 'दिलासा'च्या अध्यक्षा डॉ. रूपा शहा यांच्या हस्ते केले. डॉ. शहा यांनी किमान ५० शाळांमध्ये जाऊन मुलींच्या मनावर शिक्षणाचे व सबल होण्याचे महत्त्व बिंबवण्याचा संकल्प जाहीर केला. डॉ. अभिजीत जाधव यांनी नैसर्गिक आपत्तींमध्ये होणारी वाढ लक्षात घेता पर्यावरणाशी योग्य पद्धतीचे मानवी नाते निर्माण व्हावे यासाठीच्या प्रशिक्षणाही महत्त्वाचे असल्याचे सांगितले. आभार सचिन करमळे यांनी मानले. शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन विभागाकडील कौशल्य विकास अधिकारी प्रमोद कांबळे यांची [illegible] विशेष उपस्थिती होती.

'दिलासा' व शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन विभागातर्फे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना डॉ. रामचंद्र पवार, डॉ. रूपा शहा, डॉ. अभिजीत जाधव आदी.

■ डॉ. रामचंद्र पवार यांचे मत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात विश्व हिंदी दिन उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात विश्व हिंदी दिनानिमित्त हिंदी विभाग, बँक ऑफ बडोदातर्फे मेधावी छात्र पुरस्काराचे वितरण करण्यात आले. अध्यक्षस्थानी डॉ. एम. एस. देशमुख होते. प्रमुख पाहुणे बँकेचे महाप्रबंधक एस. के. पलनीवेल होते. शिवाजी विद्यापीठात हिंदी विषयात प्रथम आलेल्या बिल्कीस गवंडी ( जयसिंगपूर कॉलेज ) आणि अरविंद पाटील, ( देशभक्त आनंदराव बळवंतराव कॉलेज, चिखली ) यांना मेधावी छात्र पुरस्कार देण्यात आला. हिंदी दिनानिमित्त आयोजित घोषवाक्य स्पर्धेतील विजेते अनुक्रमे असे, तस्बीरा शेख, तुषार शिंदे, शुभम जीतकर, स्नेहल शाह आहेत. प्रभारी विभागप्रमुख डॉ. ए. एम. सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. प्रास्ताविक डॉ. चंदा सोनकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. विजय सदामते यांनी करून दिला. प्रकाश निकम यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2024

# कन्नच्यान सोदूलोय, मसोटीत गेल्ल्यास काय?

## चंदगडी बोलीभाषेचा बाजच निराळा

## इन्स्टाग्रामवरही जोमाने लाईक्स

सुरुते (ता. चंदगड) : येथे गावात गप्पांत रमलेले गावकरी. अशा गप्पांतून चंदगडी बोलीचा अस्सल बाज ऐकायला मिळतो.

**संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा**

'खल्लेटे व्हगाडलेसाय. कन्नच्च्यान सोदूलोय मसोटीत गेल्ल्यास काय? फोन न्हाय काय न्हाय,' चंदगडच्या नागनवाडी फाट्यावर दोन मित्रांत संवाद सुरू होता. भाषा वेगळीच वाटली, तशी उत्सुकता दाटली. 'किरम् झालंय तरी शाळेत येऊस पायजेत,' एका शिक्षकाचं आणखी एक वाक्य कानावर पडलं. 'किरम्, म्हणजे काय सर?' त्यांनाच विचारलं. 'आजारी हो,' त्यांचं उत्तर आलं. चंदगडी भाषेने मनात घर केलं. ही भाषा जाणून घेण्याचा मोह अनावर झाला. नैसर्गिक विपुलतेने संपन्न हा प्रदेश. या तालुक्यातील फेरफटक्याची ओढ नेहमीचीच. भाषेपायी पुन्हा चंदगड गाठणं आवश्यक होतं. एक दिवस तसे नियोजन करून चंदगडच्या मार्गाने रवाना झालो.

### भाषा अभ्यासकांच्या भेटीत चंदगडी गोडवा...

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे मूळचे हलकर्णीचे. त्यांचा चंदगडी भाषेचा सखोल अभ्यास. त्यांना भेटल्याशिवाय चंदगडी भाषेचा प्रवाह समजून घेणे शक्य नव्हते. त्यांची भेट घेतल्यावर त्यांनी चंदगडी भाषेवरील लेखच सादर केला. 'नुसतं सुनकुत्रंगत हिंडोस पायजे. भव्वोनभव्वोन डोगलंवी दुकनं कशां न्हायीत देव जाणे. सक्कलघरणं बदलूललोय कुटे पत्त्या न्हाय. त्या किंवड्या कळखोचऱ्याडे जाऊ नको म्हणतोय तर आयीकताय व्हय हे,' ही वाक्ये ऐकून चंदगडची गोडी आणखी वाढली. इस्टन, किरपन, करक, बेस, काड्डू, बळयान, बेडशिव, ब्याद, परास, आडाळी, रतक, डंग, किरव, कांबळ असे शेकडो शब्द चंदगडी बोलीत ऐकायला मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. चंदगडी बोलीत महिला 'मिय्या जेवलो,' 'मिय्या बाजारास गेल्लो,' असे बोलत असल्याचे ते सांगत होते. चंदगडला जाण्यासाठी त्यांचा निरोप घेऊन विद्यापीठातून बाहेर पडलो.

### मौर्य ते राष्ट्रकुट घराण्यांच्या सत्तेचे दाखले...

कोल्हापूरपासून सुमारे दीडशे किलोमीटर अंतरावर चंदगड तालुका. कागल, तवंदी, काळभैरी, गडहिंग्लज, नेसरी, नागनवाडीला पोचलो. तिथल्या हॉटेलमध्ये नाश्त्यासाठी थांबलो. तेवढ्यात शेजारच्या टेबलवरील एकाने 'जेवल्यासी,' असे त्याच्या मित्राला विचारले. तो शब्द कानात साठवून नाश्ता उरकला. चंदगडमधील शिक्षक कॉलनीत पोहोचलो.

चंदगडबद्दलची माहिती एका शिक्षकांना विचारली असता, ते म्हणाले, 'मौर्य, सातवाहन, शिलाहार, कदंब, यादव, राष्ट्रकुट घराण्यांच्या सत्तेचे दाखले चंदगड परिसरात मिळतात. कोकण, गोवा, बेळगाव, म्हैसूर-बंगलुरू, विजारपूरच्या राजवटींचा विचार येथे करावा लागतो. पोर्तुगीजांच्या अस्तित्वाच्या खुणा येथे आढळतात. कोल्हापूर-बेळगाव व्यापारी ठाण्यांना माल पुरविण्याचा मार्ग म्हणजे चंदगड तालुका.' ही माहिती ऐकून महाराष्ट्र सीमेवरच्या शेवटच्या सुरूते गावात गेलो. रताळ्यांच्या शेतात शेतकरी काही काम करत असल्याचे नजरेस पडले. 'चिन्नी घेऊन जावा की कोल्हापूरला,' एका शेतकऱ्याने आग्रह केला. 'चिन्नी,' म्हणजे काय, हा माझ्या चेहऱ्यावरील प्रश्न त्याने ओळखला असावा. लगोलग त्याच्या तोंडातून त्याला समानार्थी शब्द 'रताळी,' असा बाहेर पडला.

रिपोर्ताज

### पूर्व भागातील भाषेवर कन्नडचा प्रभाव...

चंदगडच्या पूर्व भागातील भाषेवर कन्नडचा प्रभाव आहे. त्यात आवंदू (यावर्षी), चकोट (चांगल्या), गावणे (सापडणे), व्हगाळणे (शिवीगाळ करणे), कनावणे (दुखणे), तरवा (तरू), गादा (शेत) असे शब्द आढळतात. तूज, माज, त्यास, तिण्ण, मिण्ण, त्यण्णानी, ह्यणाणी, ही सर्वनामे भाषेत महत्त्वाची. पश्चिम भागातील भाषेचा लहेजा वेगळा ठरतो. या भाषेचा हेलच निराळा आहे. 'जाऊलेसाय?' म्हणजे तू जात आहेस का? असा त्याचा अर्थ होतो. बोलीतील विशेषणांचा अर्थ समजावून घेताना कस लागतो. एकदा त्याचा अर्थ कळाला की, भाषा समजण्याचा मार्ग सुकर होतो. बुरसा (घाणेरडा), थबला (जाड), किरपण (बारीक) ही विशेषणे भाषेला समृद्ध करतात.

### चंदगडी बोलीत नाटकाचे प्रयोग...

दौलत कारखान्यापासून जवळ असणाऱ्या करंजगावचे रहिवासी परसू गावडे पेशाने शिक्षक. नाटक हे त्यांचे अविभाज्य अंग. ते स्वत: दिग्दर्शक तसे लेखकही आहेत. त्यांची भेट घेतली असता त्यांनी चंदगडी बोलीभाषेत 'व्हय आम्ही चंदगडी,' नाटकाचे दिग्दर्शन केल्याचे समजले. त्याचे पंचवीसहून अधिक प्रयोगही सादर केले होते. पाच-सात वर्षापूर्वी बसविलेल्या नाटकाच्या तालमीसह प्रयोगांना त्यांनी उजाळा दिला. ग्रामपंचायत, स्वच्छता या भोवती नाटक गुंफले होते. चंदगडी बोलीचा प्रचार करण्याच्या उद्देशाने त्याचे लेखन केल्याचे ते सांगत होते. विशेष म्हणजे अलीकडे इन्स्टाग्रामवर चंदगडी बोलीभाषेचा प्रचार करण्याची स्पर्धाच लागल्याचे दिसते. सरिता देसाई ही युवती चंदगडी भाषेचा गोडवा सांगताना दिसते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2024
तरुण भारत

# दिपाली पाटीलची हॉकी स्पर्धेसाठी निवड

**प्रयाग चिखली :** वडणगे (ता. करवीर) येथील दिपाली सरदार पाटील या विद्यार्थीनीची ग्वाल्हेर येथे दि.१३ ते १७ जानेवारी अखेर होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला हॉकी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघामध्ये निवड झाली. भोगावती महाविद्यालय कुरुकली येथे ती महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे. या खेळासाठी हॉकी प्रशिक्षक मोहन भांडवले, प्राध्यापक राहुल लहाने, सुनील खराडे, संतोष चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ।
12 JAN 2024
तरुण भारत

# राजस्थानमधील साऊथ वेस्ट झोन ज्युदो स्पर्धेसाठी साक्षी व वैष्णवीची निवड

ज्यूदो स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघामध्ये निवड झालेल्या विद्यार्थिनी समवेत प्रा. संग्रामसिंह मोरे

कोलोली : शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर या ठिकाणी पार पडलेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय ज्युदो स्पर्धेमध्ये श्रीपतराव चौगुले कॉलेजमधील बी.एस्सी.भाग – १ ची विद्यार्थिनी साक्षी सुभाष मगदूम हिने ४८ किलो वजन गटामध्ये सुवर्ण पदक पटकावले तर वैष्णवी शिवाजी पाटील हिने ५२ किलो वजन गटामध्ये सुवर्ण पदक पटकावले. या विद्यार्थिनींची निवड बनस्थळी विद्यापीठ, राजस्थान या ठिकाणी होण्रया साऊथ वेस्ट झोन ज्यूदो स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघामध्ये झाली आहे, अशी माहीती प्राचार्य डॉ विजयकुमार पाटील यानी दिली.त्यांना ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक–अध्यक्ष व जि. प.चे माजी बांधकाम व आरोग्य समिती सभापती डॉ.के.एस.चौगुले,संस्था सचिव शिवाजीराव पाटील, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संग्रामसिंह मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2024
सकाळ

कळे : येथील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयाच्या तीन रग्बी खेळाडूंची राष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली.

# आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी 'विठ्ठलराव'च्या तिघांची निवड

कळे, ता. ११ : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे झालेल्या आंतरविभागीय निवड चाचणी स्पर्धेतून येथील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयातील संचित युवराज पाटील, अवधूत शहाजी पोवार, सुशांत नवनाथ पोवार यांची चंदीगड (पंजाब) येथे होणाऱ्या ऑल इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघामध्ये निवड झाली. २० ते २५ जानेवारीदरम्यान चंदीगड येते होणाऱ्या स्पर्धेसाठी या संघाचा सराव विद्यापीठामध्ये सुरू आहे. त्यांच्या या निवडीस संस्थापक अध्यक्ष विठ्ठलराव पाटील, उपाध्यक्ष राहुल पाटील, संस्था प्रतिनिधी डॉ. नितीन पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर राक्षसे यांचे सहकार्य लाभले. त्याचबरोबर महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विक्रम यमगेकर यांचे मार्गदर्शन लाभले.